# माथेरान पर्यटन महोत्सव मे महिन्यात

## २६ एप्रिलपासून ठाण्यात सुरुवात होणार

अलिबाग, ता. ८ : पर्यटकांची संख्या वाढावी आणि पर्यटन उद्योग भरभराटीला यावा यासाठी माथेरान पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

१९ ते २३ मे २०११ या पाच दिवसांत माथेरान महोत्सव होणार आहे; तसेच २६ एप्रिल २०११ रोजी ठाण्याच्या गडकरी रंगायतन येथून माथेरान महोत्सवाचा शुभारंभ होणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले. या प्रसंगी माथेरान महोत्सवाच्या चित्रफितीचे व 'माथेरान महोत्सव २०११' लोगोचेही प्रकाशन सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी कर्जत-खालापूरचे आमदार सुरेश लाड, जिल्हाधिकारी सुभाष सोनावणे, माथेरान प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सावंत, उपाध्यक्ष विवेक चौधरी, सचिव संतोष पवार यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

**महोत्सवातील कार्यक्रम**

मंगळवार, २६ एप्रिल २०११ रोजी ठाणे येथे 'माथेरान जसं आहे तसं' छायाचित्र प्रदर्शन, 'कुंचल्यातील माथेरान' निसर्गचित्रांचे प्रदर्शन, माथेरान उद्योग-व्यवसाय व चर्मोद्योगांची माहिती देणारे स्टॉल्स, माथेरान भूषण व माथेरान मित्र पुरस्कारांचे वितरण आणि भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. १९ ते २३ मे २०११ माथेरानमध्ये अश्वशर्यती, व्हॅली क्रॉसिंग, इको मॅरेथॉन, मिस्टर माथेरान, माथेरान ब्युटी क्वीन स्पर्धा, सर्प प्रदर्शन, शोभायात्रा, राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा, कपल ऑफ द सीझन स्पर्धा, आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रम, माथेरान सखी, जंगल ट्रेकिंग असे कार्यक्रम होणार आहेत.